डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर येथील भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाची (B.P.Th) प्रवेशक्षमता वाढ करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक.एमईडी १०१९/प्र.क्र.३९२/२०/शिक्षण-२
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई ४०० ००१
दिनांक:- ०३ नोव्हेंबर, २०२०

संदर्भ:- १) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र.संवैशिवसं//युजी/प्रवराअभिमत/डीएपीजीअकफॉफिनगर/सक्षमता तपासणी /युजी-०४/२०२०/२-अ, दिनांक १६/०७/२०२०

२) शासन पत्र क्र.एमईडी १०१९/प्र.क्र.२९२/१९/शिक्षण-१, दिनांक २५/०२/२०२०

३) कुलसचिव, प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस(अभिमत विद्यापीठ), लोणी यांचे पत्र क्र.पिआयएमएस/सीओपीटी/२०१९/३१६, दिनांक २५/०७/२०१९

**प्रस्तावना** :- डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर या संस्थेतील भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्याचा प्रस्ताव वरील संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस(अभिमत विद्यापीठ), लोणी यांचेकडून शासनास प्राप्त झाला होता. त्यानुसार सक्षमता तपासणी करुन संदर्भाधीन क्रमांक १ च्या पत्रान्वये संचालनालयाकडून शासनास शिफारस सादर करण्यात आली असल्याने भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता ५० वरुन १०० इतकी वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:- डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर या संस्थेस सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून पुढीलप्रमाणे बी.पी.टीएच हया भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढ करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

| अभ्यासक्रम/विषय | प्रवेशक्षमता |
|---|---|
| बी.पी.टीएच(B.P.Th) | ५० वरुन १०० |

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील:-

१) सदर महाविद्यालयातील भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेशक्षमता १०० (शंभर) इतकीच राहिल.

२) राज्य शासन, केंद्र शासन, मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्‍चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३) राज्य शासनाने तसेच विद्यापीठाने भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ (महाराष्ट्र अॅक्ट १९९८ चा मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

५) संस्थेने उपरोक्त भौतिकोपचार महाविद्यालयास प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस अभिमत विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेत विद्यार्थी प्रवेश करावेत.

६) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नये.

७) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे . त्यामुळे संस्थेकडून आवर्ती/अनावर्ती वा अन्य स्वरुपाच्या कोणत्याही खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही.

८) )शासकीय वैद्यकीय/भौतिकोपचार किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकांस तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

९)प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ) यांनी संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था विहित मानकांची पूर्तता करीत आहे याची खात्री करावी.

३. सदर आदेश हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजित सासुलकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
कुलसचिव, प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस अभिमत विद्यापीठ, लोणी, ता.राहता,जि.अहमदनगर
प्राचार्य, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लोणी, ता.राहता, जि.अहमदनगर
निवडनस्ती (शिक्षण-२)